# मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
## सायबर गुन्हे शाखा

३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओस्तवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर – ०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :-४५७/२०२२ दिनांक :- १५/०३/२०२२.

**सिम KYC Update करावयाचे सांगून ४९,५२०/- रु ची फसवणूक केलेली रक्कम परत केलेबाबत - सायबर गुन्हे कक्षाची कामगिरी**

दिनांक १०/०३/२०२२ रोजी सायबर गुन्हे कक्ष येथे मोबाईलचे सिमकार्ड ची केवायसी अपडेट करावयाचे सांगुन ४९५२०/- रु ची फसवणुक झाल्याबाबत तक्रारी अर्ज प्राप्त करण्यात आला होता. सदर तक्रारीमध्ये तक्रारदार यांना त्यांचे मोबाईल वर फोन करुन जिओ कंपनीचा मोबाईल क्रमांकाचे तात्काळ केवायसी अपडेट करावयाचे असल्याचे सांगितले. तसे न केल्यास नंबर बंद होईल असे सांगुन त्यांचे मोबाईलवरुन १०/- रु चे रिचार्ज त्यांचे डेबिट कार्डद्वारे करण्यास सांगितले. तक्रारदार यांनी त्यांचे डेबिट कार्डची माहिती भरुन रिचार्ज करताच त्यांचे खात्यातुन एकुण ४९५२०/-रु कपात झाल्याचा त्यांना मॅसेज प्राप्त झाला. त्यावर त्यांची फसवणुक झाल्याबाबत तक्रारी अर्ज सायबर गुन्हे शाखा येथे वरील संदर्भान्वये प्राप्त झाला आहे.

सदर तक्रारी अर्जाचे अनुषंगाने पोउनि/शेनोळकर यांनी तात्काळ कारवाई करुन तक्रारदार यांचे झालेल्या ट्रान्झॅक्शनचे अनुषंगाने पेटीएमसोबत पत्रव्यवहार केला. तसेच तक्रारदार यांचे खात्यातुन फसवणुकीचे ट्रान्झॅक्शन झाले असुन फसवणुक झालेली रक्कम तक्रारदार यांचे खात्यात जमा होणेबाबत पेटीएम कंपनीला कळविण्यात आले. उपरोक्त पत्रव्यवहाराचे अनुषंगाने तक्रारदार यांचे पेटीएमकडुन ट्रान्झॅक्शन रद्द होवुन तक्रारदार यांचे खात्यात त्याची फसवणुक झालेली एकुण ४९५२०/- रु परत जमा करण्यात आलेली आहे.

सायबर गुन्हे कक्ष यांचेकडून सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही अनोळखी व्यक्तीने फोन करुन मोबाईल नंबरची **KYC/ बँक खात्याची KYC Update करण्यात सांगितले त्यास आपली कोणतीही माहिती देवु नये. आपल्या क्रेडिट/ डेबिट कार्डाची माहिती ऑनलाईन भरुन शेयर करु नये. बँकेची अगर मोबाईल क्रमांकाची माहिती अपडेट करायची असल्यास ती स्वत: बँकेत जावुन अगर मोबाईल गॅलेरीमध्ये जावुन करावी. आपण सतर्क राहुन आपली फसवणुक रोखु शकतो. बँक किंवा मोबाईल कंपन्यां मोबाईलवर संपर्क साधून अथवा संदेश पाठवून KYC Update करण्यास सांगत नाही.**

सदरची कामगिरी मा.श्री.डॉ.महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा.श्री.अमोल मांडवे,सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली श्री.सुजितकुमार गुंजकर, पोनि/सायबर क्राईम सेल, श्री.प्रसाद शेनोळकर, पोउनि/सायबर क्राईम सेल, मपोशि/सुवर्णा माळी, सायबर क्राईम सेल, मपोशि/ माधुरी धिंडे, सायबर क्राईम सेल यांनी केली आहे.

----